ओटीटी प्लॅटफॉर्मवरील वेबसिरीजमध्ये प्रतिबिंबित जातवास्तव : संप्रेषणशास्त्रीय अभ्यास

आंतरविद्याशाखे अतंर्गत जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विषयात पीएच.डी. पदवीसाठी
पुर्व संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधक
दवणे हर्षवर्धन किशनराव
माध्यमशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
प्रो.डॉ.राजेंद्र गोणारकर
संचालक
माध्यमशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र
माध्यमशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2022-2023

ओटीटी प्लॅटफॉर्मवरील वेबसिरीजमध्ये प्रतिबिंबित जातवास्तव : संप्रेषणशास्त्रीय अभ्यास

1. प्रस्तावना :

मानवी संस्कृतीच्या अभ्युदयामध्ये प्रत्येक तांत्रिक क्रांतीने नवीन संज्ञापन क्रांतीला जन्म दिला आहे. तथापि प्रबोधनानंतर कला-शास्त्र, विज्ञान-तंत्रज्ञान, भौगोलिक शोध या क्षेत्रांत नवनवीन बदल होऊन संदेशाश वहनाची साधने प्रगत होत गेली. त्यानुसार विरळच्या दोन भागांतील खंडातील अंतर कमी आहेत, त्या कधी ही एकत्र येणार नाहीत, हे रुडीयार्ड किपलींगचे कथन नवीन संवाद क्रांतीने खोटे ठरविले.

नवीन प्रसार माध्यमांचा विस्तार हा सकळ मानवी इंद्रियांचा विस्तार ठरला आहे. नभोवाणी हा कानाचा विस्तार, दूरचित्रवाणी हा डोळयांचा विस्तार आणि संगणक, इंटरनेट, अँड्राईड मोबाईलने मानवी मज्जासंस्थेचा विस्तार केला आहे.

नवीन तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर माध्यमांच्या संस्थेत व दूरगामी प्रभाव क्षमतेत वाढ हात असतांना माध्यमांचा समाजावर होणारा परिणाम तीव्र बनत आहे. त्यामुळे माध्यम व समाज यामधील आंतरक्रियांचे आकलन हा संप्रेषणशास्त्राचा अभ्यासाचा एक मौलिक पैलू होय. माध्यमांच्या द्वारे शासन व धोरण नियोजकांना आपल्या कार्यात यथायोग्य बदल करता येतात. याबाबत माध्यमांचे महत्व सांगतांना मा.माक्विल म्हणतात, "Media relate to questions on which public opinion often forms, on which governments may be expected to have policies for prevention or improvement, or on which the media themselves might have some responsibility.... they involve questions of current and future trends that are significant for good or ill."1

एखाद्या प्रश्नाबाबत जनमत तयार करताना समाजातील भल्या-बुर्या प्रवृत्तीचे यथार्थ दर्शन घडविण्याचे कार्य माध्यमांना करावे लागते. त्यामुळे संप्रेषणशास्त्रात माध्यमकेंद्री, समाजकेंद्री, संस्कृतिकेंद्री आणि भौतिकेंद्री असे चार माध्यमाकडे पाहण्याच्या दृष्टीकोणानुसार या प्रवाहातही अनेक बदल होत असताना दिसतात. या बदलांची नोंद संप्रेषणशास्त्राचे अभ्यासक घेताना दिसतात, संप्रेषणशास्त्र हे आंतरविद्याशाखीयशास्त्रआहे. त्यांच्या स्वरुपामध्ये नियामक, वर्तनवादी आणि सांस्कृतिक अशी विविध परिणामे आहेत.

संवाद माध्यमासाठी 1980 चे दशक अतिशय महत्वाचे होते. या दशकात संगणक शास्त्रज्ञांनी इंटरनेट प्रणालीवर काम सुरू केले होते. 1990 मध्ये संगणक शास्त्रज्ञ टीम बार्नर्सयांनी इंटरनेटचा शोध लावला. या संशोधनाने माहिती तंत्रज्ञानाच्या जगात नवीन क्रांती घडून आणली. आज इंटरनेटचे जाळे जगाच्या काना कोपऱ्यापर्यंत पोहोचले आहे. 21 व्या शतकाच्या पहिल्या दशकात इंटरनेवर समाजमाध्यमांचे (सोशल मिडीयाचे) आगमन झाले. या मध्ये सुरुवातीला विकिपिडीया ही जनमाहितीची वेबसाईट नंतर मौखिक संभाषण साधणारे "स्काईप" हि वेबसाईट सुरू झाली. द फेसबुक (The Facebook) म्हणजे आजचे फेसबुक (Facebook) चे आगमन 2004 मध्ये झाले. युट्युब 2005, ट्विटर 2006 मध्ये सुरू झाले. समाज माध्यमानी जनसंवाद माध्यमाचा दृष्टिकोणच बदलेला आहे.

आज भारतात 40 कोटी पेक्षा अधिक लोक हे विविध समाज माध्यमाचा वापर करतात.

2. ओटीटी प्लॅटफॉर्म :

समाजमाध्यमामध्ये मनोरंजनासाठी आज मोठ्या प्रमाणात ओटीटी प्लॅटफॉर्मचा उपयोग केला जातो. ओटीटी प्लॅटफॉर्म हे इंटरनेटच्या जगातील मनोरंजन व संवादाचे सर्वात प्रभावी डिजीटल प्लॅटफॉर्म आहे. मागच्या दोन दशकात स्मार्टफोन, ऍ़न्ड्राईड फोनने संप्रेषण माध्यमामध्ये क्रांती घडून आणली आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या टेलिव्हिजन व चित्रपट गृहामधील मर्यादा इंटरनेटच्या माध्यमातून स्मार्टफोन व ऍ़न्ड्राईड फोनने ओलांडल्याआहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म म्हणजे ओवर द टॉप (Over The Top) होय. भारतात 2008 मध्ये ओटीटी प्लॅटफॉर्मची सुरूवात Reliance Entertainment च्या "Bix Flix" या ओटीटी प्लॅटफॉर्मद्वारे झाली. तर 2010 मध्ये डिजिवाइव या NEXG TV या ओटीटी मोबाईल ऍ़पची सुरूवात झाली. ज्यामध्ये व्हिडिओ ऑन डिमांड तसेच टीव्ही शो दाखविले जात होते. Nexg TV चे पहिले थेट प्रसारण मोबाईलद्वारे 2014 च्या IPL च्या स्पर्धा दाखविल्या होत्या. आज भारतात शेकडो विविध भाषेमधील ओटीटी प्लॅटफॉर्म आहेत. चित्रपट, संगीत, विविध खेळाच्या स्पर्धा व विशेष म्हणजे ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी निर्माण करण्यात आलेल्या वेबसिरीज ज्या मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहेत.

2019 ते 2021 या कोरोना कोविड मधील दोन वर्षाच्या लॉकडाऊनमध्ये चित्रपटगृह व नविन कन्टेनसाठी एक पर्याय म्हणून ओटीटी प्लॅटफॉर्म जोमात उभे टाकले आहेत. "2021 मध्ये भारतात ओटीटी प्लॅटफॉर्म चा उद्योग 1.5 अरब डॉलरचा होता. तर 2025 मध्ये 4 अरब डॉलरचा होईल व 2030 पर्यंत 12.5 अरब डॉलरचा अनुमान लावला जात आहे."2

3. वेबसिरीज :

भारतातील ओटीटी प्लॅटफॉर्मवर सर्वाधिक वेबसिरीज प्रदर्शित होतात. ओटीटी प्लॅटफॉर्मच्या आर्थिक भरभराटीस वेबसिरीज हे मैलाचा दगड ठरत आहेत. वेबसिरीज

म्हणजे वेबमालिका होय. टेलिव्हिजनवर येणाऱ्या मालिकाप्रमाणेच पण चित्रपटासारख्या गतिमानव भडक अशा या मालिका असून टेलिव्हिजन वरील मालिका व चित्रपट या पेक्षा वेगळे अस्तित्व वेबसिरीजचे आहे.

"वेबसिरीज ही सिरीयल किंवा मालिका जी व्हिडीओ एपिसोडची मालिका आहे. जी इंटरनेटवर रिलीज केली जाते आणि वेब शो म्हणून ओळखली जाते. वेबसिरीज देखील टी.व्ही. सिरीयलसारख्या डिझाईन केल्या आहेत. वेबसिरीज केवळ डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रसारीत केली जाते, यास इंटरनेवर प्रसारित केल्यामुळेच वेबसिरीज म्हणतात"3

दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर इंटरनेटद्वारे डिजीटल प्लॅटफॉर्म, ओटीटी प्लॅटफॉर्म, वेबसाईड व ऍप वर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या मालिका जे एक किंवा अनेक पर्वामध्ये प्रदर्शित केले जातात तसेच या मालिका पाहण्यासाठी इंटरनेटचा वापर तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मची महिनेवारी किंवा वार्षिक शुल्क आदा करावी लागते. वेब म्हणजे इंटरनेटचे जाळे तर सिरीज म्हणजे मालिका होय, एकत्रित अर्थाने यास वेबसिरीज म्हटले जाते.4

वरील दोन्ही ही संकल्पनेवरुन वेबसिरीज ही इंटरनेटच्या विविध माध्यमावर प्रदर्शित होणारी 5 ते 10 भागाची प्रतिभाग हा 40 ते 48 मिनीटे चालवली जाणारी एक किंवा त्या पेक्षा अधिक पर्व असणारी मालिका होय.

वेबसिरीजची सुरूवात 1990 च्या दशकाच्या उत्तरर्धात झाली. 2000 च्या दशकात वेबसिरीज ह्या मोठ्या प्रमाणात प्रदर्शित होऊ लागल्या. भारतात वेबसिरीज निर्मितीचा पहिला यशस्वी प्रयोग 2009 मध्ये प्रतिक अरोरा यांनी "कंपनी बहादूर" या वेबसिरीजद्वारे झाला आहे.

वेबसिरीज या सेन्सॉर बोर्ड मुक्त असल्यामुळे या चित्रपटापेक्षा भडक विषयावर चित्रिकरण करण्यासाठी दिग्दर्शकांना संधी मिळते. तसेच वेबसिरीज निर्मितीही चित्रपट निर्मिती पेक्षा कमी खर्चात आहे. नवोदित व वंचित घटकातील कलाकारांना वेबसिरीजच्या माध्यमातून संधी उपलब्ध होत आहेत. तसेच सामाजिक वास्तव असणाऱ्या कथांना इथे वाव मिळत असून वर्तमान सामाजिक स्थितीवर चित्रिकरणाचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात होत आहे.

आज भारतात वेबसिरीज या हॉटस्टार, नेटफ्लिक्स, अमेझॉन प्राईम व्हिडिओ, सोनी लिव, ऑल्ट बालाजी, जी 5, एमएक्स प्लेयर, जीओ सिनेमा, इरोसनाऊ या सारख्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहेत. भारतातील लोकप्रिय ठरलेल्या वेबसिरीजमध्ये सेक्रेट गेम्स, मिर्जापूर, असूर, आश्रम, लिला, द फैमेली मैन, पंचायत, कोटा फैक्ट्री, स्कैम 1992, गुल्लक या व इतर काही आहेत.

संप्रेषण माध्यमामध्ये ओटीटी प्लॅटफॉर्म वर प्रदर्शित वेबसिरीज या सामाजिक वास्तवाचे प्रतिबंब उमटवत आहेत. तसेच या वेबसिरीजचे विषय हे चित्रपटाप्रमाणेच असून यातून प्रेक्षकांसोबत संवाद साधला जातो. आज वेबसिरीजचा प्रेक्षक वर्ग भारतात 35 कोटीच्या वर आहे.

4. **समस्यासुत्रण :**

देशातील इलेक्ट्रॉनिक माध्यमानी भारतीय जाती व्यवस्थेचे चित्र मोठ्या प्रमाणात केले नाही. टेलिव्हिजन वरील मालिका, चित्रपट यांनी जातीच्या समस्याकडे दुर्लक्ष केले आहे. काही विशेष चित्रपट सोडले तर, भारतीय समाजाचा आधारच जात आहे. जी विषमतावादी सिध्दान्तावर आधारित असून ही व्यवस्था दमणकारी, शोषण करणारी आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती हा कोणत्या ना कोणत्या जातीचा आहे. जात ही एक गंभीर समस्या असून भारतीय टेलिव्हिजन व चित्रपटानी या समस्येकडे दुर्लक्ष

केले आहे. वेबसिरीज ही जातीच्या समस्येकडे दुर्लक्ष करत आहेत का? या संदर्भात प्रस्तुत संशोधन विषयात अध्ययन करण्यात येणार आहे.

5. संशोधनाचे महत्व :

विविध सामाजिक समस्येवर संवाद साधने ही गरजेची बाब असून संवादातून समस्यांचे निराकरण करता येते. संवाद माध्यमाची नैतिक जबाबदारी आहे की ते सामाजिक समस्या माध्यमाद्वारे मांडणे त्या संदर्भात भाष्य करणे.

आजचे युग हे समाज माध्यमांचे युग आहे. यापैकी ओटीटी प्लॅटफॉर्म हे समाज माध्यम म्हणून अति प्रचलित झाले आहे. यावर प्रदर्शित होणाऱ्या वेबसिरीज या विविध पूर्ण आहेत. वेबसिरीजचा प्रेक्षक वर्ग हा तरुण व शिक्षित आहे. म्हणजे सामाजिक जबाबदार वर्ग आहे. या वर्गावर वेबसिरीजचा काय परिणाम होतो, वेबसिरीज मधून सामाजिक विषय मांडले जातात का? या प्रश्नांचे अध्ययन महत्वाचे आहे. तसेच वेबसिरीज संदर्भात मोठ्या प्रमाणात संशोधन झाले नाही. या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे. तसेच टेलिव्हिज व चित्रपटानी ज्या पध्दतीने जातीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले त्याच पध्दतीने वेबसिरीज ही या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहेत का? याची पडताळणी करणे, तसेच वेबसिरीजमधून कोणत्या संवाद साधला जातो त्याचे तंत्र काय हे जाणून घेण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

6. संशोधन विषयाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती भारतात मागच्या एक दशकापासुन प्रचलित पावलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्म वरील वेबसिरीज मधुन साधण्यात आलेल्या संवादाचा अभ्यास करणे. वेबसिरीजमध्ये मांडण्यात आलेल्या सामाजिक समस्याचे अध्ययन,

तसेच वेबसिरीजच्या प्रेक्षक वर्गावर होत असलेल्या परिणामाचे अध्ययन व्यापक होणार आहे.

7. संशोधन विषयाचे उद्देश :

1. ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित वेबसिरीजमध्ये उमटलेल्या जात जाणीवाचा अभ्यास करणे.
2. ओटीटी प्लॅटफॉर्म वरून प्रदर्शित वेबसिरीजमध्ये दलिता वरील अन्याय व दमनाचे चित्रण कसे झाले आहे याचा शोध घेणे.
3. ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित वेबसिरीजमधील जातीय संघर्षाचे चित्रण वस्तुनिष्ठ पणे झाले आहे का? हे समजुन घेणे.
4. वेबसिरीजमध्ये उपेक्षित, वंचित व नवोदित कलाकारांना संधी प्राप्त होत आहे का? याचा शोध घेणे.

8. संशोधन विषयाचे गृहितकृत्ये :

1. भारतातील जाती संबंधित समस्येबद्दल जागरुकता वाढल्याने वेबसिरीजमध्ये जातीचे प्रतिबिंब दिसत आहे.
2. ओटीटी प्लॅटफॉर्म वरील प्रदर्शित वेबसिरीजमध्ये दलितावरील अन्याय व दमनाचे चित्रीकरण वास्तववादी आहे.
3. ओटीटी प्लॅटफॉर्म वरून प्रदर्शित वेबसिरीजमधून जात-जाणिवाचे चित्रण दर्शकावर सकारात्मक व नकारात्मक प्रभाव करणारे आहे.
4. ओटीटी प्लॅटफॉर्म वरील वेबमालिकेमध्ये वैविध्यपूर्ण पार्श्वभूमीतून तथा उपेक्षित जातीमधील कलाकाराना संधी प्राप्त होत आहे.

9. **संशोधन विषयाचा कालखंड :**

प्रस्तुत संशोधन विषयाचा कालखंड हा वर्ष 2018 ते वर्ष 2023 असा निर्धारीत करण्यात आला आहे. यात लॉकडाऊनच्या दोन वर्षासह इतर तिन वर्षाचा समावेश करण्यात आला आहे. या पाच वर्षात मोठ्या प्रमाणात वेबसिरीज प्रदर्शित झाल्या आहेत. तसेच याच कालावधीमध्ये वेबसिरीजचा प्रेक्षक वर्गात वाढ झाली आहे.

10. **संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी सामाजिक संशोधन पध्दती व संप्रेषणशास्त्रीय पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच चित्रपट अध्ययन सिध्दांताचा ही वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी गुणात्मक व गणात्मक पध्दत वापरली जात आहे. त्यामध्ये आशय विश्लेषण पध्दती व सर्वेक्षण पध्दतीचा वापर करुन तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

11. **तथ्य संकलन :**

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

12. **नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी नमुना निवडण्यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्यानुसार मुख्य स्वरुपात 5 वेबसिरीज तसेच सहाय्यक म्हणून इतर 15 वेबसिरीजचे अध्ययन करण्यात येणार आहे.

तसेच विषय अध्ययनासाठी प्राथमिक तथ्य संकलनासाठी वेबसिरीज पाहणाऱ्या 200 प्रेक्षकांची निवड ही गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीद्वारे करण्यात येणार आहे.

गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दतीने निवडण्यात आलेल्या मुख्य पाच वेबसिरीज

अ. क्र.	वेबसिरीज	शैली	प्रदर्शित दिनांक	ओटीटी प्लॅटफॉर्म	दिग्दर्शक	एपिसोड
1.	मिर्झापूर पर्व-1	गुन्हे आणि रोमांच	16 नोव्हेंबर 2018	अमेझॉन प्राईम व्हिडिओ	करण अंशुमन व गुरमीत सिंह	9
2.	दहाड	गुन्हे व रहस्य	12 मे 2023	अमेझॉन प्राईम व्हिडिओ	रिमा कागती व रुचिका ओबेरॉय	8
3.	पाताल लोक	गुन्हे व रहस्य	15 मे 2020	अमेझॉन प्राईम व्हिडिओ	अरुण व प्रोसित रॉय	9
4.	आश्रम पर्व-1	गुन्हा व नाट्य	28 ऑगस्ट 2020	एमएक्स प्लेअर	प्रकाश झा	9
5.	लिला	भविष्यातील नाट्य	14 जुन 2019	नेटफ्लीक्स	दिपा मेहता, शंकर रमन, पवन कुमार	6

13. संशोधन विषयाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या मर्यादा या निश्चित करण्यात आल्या असून प्रस्तुत विषयाचा कालावधी पाच वर्ष आहे. वेबसिरीजने अनेक सामाजिक विषयावर

चित्रिकरण केले आहे. संशोधन भटकणारे ठरणार नाही, यासाठी फक्त जाती संदर्भातील चित्रिकरणावरच अध्ययन करण्यात येणार. शेकडो वेबसिरीजमधून फक्त 5 मुख्य वेबसिरीजचे अध्ययन करण्यात येणार आहे.

14. संशोधन विषयाचा आराखडा :

1. समस्यासुत्रण
2. संशोधनाचे महत्व
3. संशोधन विषयाची व्याप्ती
4. संशोधन विषयाचे उद्देश
5. संशोधन विषयाचे गृहितकृत्ये
6. संशोधन विषयाचा कालखंड
7. संशोधन पध्दती
8. तथ्य संकलन
9. नमुना निवड
10. संशोधन विषयाच्या मर्यादा
11. अभ्यास व आशय विश्लेषण
12. उद्देश व गृहितकृत्येची पडताळणी
13. निष्कर्ष, अहवाल व सूचना

15. अभ्यास व आशय विश्लेषण :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन करुन आशय विश्लेषण व वर्गीकरण करुन गृहितकृत्याची पडताळणी करण्यात येणार आहे. यामध्ये वेबसिरीजचे अध्ययन हे संप्रेषणशास्त्रानुसार करण्यात येणार आहे. तसेच आशय विश्लेषणासाठी संशोधन पध्दती व संप्रेषण शास्त्रीय सिध्दांताचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक तथ्याद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीची संख्याकीय साधणाद्वारे वर्गवारी करुन विश्लेषण करण्यात येणार आहे.

16. प्रकरण रचना :

प्रस्तुत संशोधन विषयाचे अध्ययन हे पाच प्रकरणात करण्यात येणार आहे.

1. विषय प्रवेश
2. संशोधन पध्दती व संदर्भग्रंथ आढावा
3. वेबसिरीजचे आशय विश्लेषण
4. वेबसिरीजचा प्रेक्षकांवरील प्रभाव
5. उपसंहार व निष्कर्ष

17. संदर्भग्रंथ आढावा :

1. "स्वातंत्र्य आणि नैतिकता यांचे रक्षण करण्यासाठी जबाबदारी चित्रपटांवर असते. परंतु स्वातंत्र्याचा सुयोग्य वापर करुन घेण्याऐवजी, नैतिकतेचे श्रोत्यांना धडे देण्याऐवजी, भारतीय चित्रपट हे संघर्ष, हिंसाचार व उथळ शृंगाराचे चित्रण करुन पलायनवादी अपप्रवृत्तींचा प्रसार करीत आहेत. वास्तविकतेला दूर करुन कृत्रिम सुखाचा आनंद मानण्याकडे अडकलेली भारतीय चित्रपट सृष्टी वास्तवाचा शोध घेऊ शकणार नाही. माध्यमे ही जगाकडे बघण्याची खिडकी आहे.

विशेषत: कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात बाहेरच्या जगाचे चांगले प्रवाह समाजात आणण्याचे कार्य या खिडकीमार्फत होते."5 *डॉ.पवार सुधाकर : वृत्तपत्राचे तत्त्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ मंडळ, नागपूर, आवृत्ती 1990, पान क्र.94.*

2. "चित्रपट हे कलात्मकता व तंत्रज्ञान यांचा संगम असलेले सजनशील असे दृश्य माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षण यांचे प्रभावी साधन आहे. पडद्यावरील हालत्या चालत्या प्रतिमांतून जीवनाचे दर्शन घडविणारी ही कला छायाचित्रण व इतर तांत्रिक कौशल्याचे अपत्य होय."6 *शेवाळे माधव, भारतीय चित्रपट, निहार प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, 1992, पान क्र.128.*

3. श्रीपाद जोशी म्हणतात "मुळात एका व्यक्तीद्वारे इतर व्यक्तीकडे अथवा व्यक्ती समूहाकडे चिन्हाद्वारे केल्या गेलेल्या माहितीचे प्रेक्षपण अथवा 'सर्वसाधारणपणे एका व्यवस्थेने प्रेषकाने, दुसऱ्या व्यवस्थेवर वा स्वीकारकावर एकमेकांचा दुवा साधणाऱ्या माध्यमांच्या साहाय्याने, विविध चिन्हांच्या कुशल वापराद्वारे साधलेला प्रभाव किंवा संदेशाद्वारे चालणारी सामाजिक आंतरक्रिया असा संवाद क्रियेचा व्यापक अर्थ लावण्यात येतो."7 *जोशी श्रीपाद,संवादशास्त्र, संभव प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती मार्च 1990, पान क्र.12.*

4. "साल 2020 ने लोगों से बहुत कुछ छीना है मगर यह कहना गलत नही होगा की इस साल हमे लोगों को हिंदी सिनेमाने बहुत से ऐसे किरदार दिए हैं, जिन्हे आने वाले कई सालों तक वाद किया जाएगा। इस साल ऐसी कई फिल्में और वेब सीरीज ओटीटी प्लेटफॉर्म्स (OTT Platforms) पर देखने को मिली जो समाज और राजनीति का आईना रही। ओटीटी प्लेटफॉर्म्स (OTT Plantforms)

पर मौजूद उन पिल्मों और वेब सिरीज का हमारी Best of 2020 लिस्ट में ना होना जरा बेइंसाफी होगी।"

"स्क्रीन पर फिल्माए उन किरदारों के चश्मे से समाज और राजनीति के 'सच' को देखा जा सकता है। ऐसा सच जो आपके और मेरे बीच मौजूद होते हुए भी हमसे अनजान है।"8 *अभिषेक कुमार, Best of 2020 : समाज और राजनीति का आईना रहीं इस साल की यह फिल्में और वेब सिरीज https://hindi.newsgram.com/best-of-200-ott-plantforms/*

5. "ऊंची जाति का एक राजनेता जो एक दलित के घर खाना खाने के बाद अपनी आत्मा की शुद्धि के लिए गंगाजल से नहाता है और मॉब लिंचिग - पाताल लोक में ऐसा कुछ भी नहीं है जो हमारे जीवन से एकदम अलग हो। पटकथा और पात्र, दोनों प्रभावशाली हैं। वे आपके सामने कुछ प्रश्न उपस्थित करेंगे और उनके उत्तर भी देंगे।"9 *(अनुवाद : अमरीश हरदेनिया, संपादन : नवल) https://www.forwardpress.in/2020/05/paatal-lok-how-our-feudal-casteist-and-communal-society-churns-out-murderers-hindi/*

6. "एपिसोड दर एपिसोड यह सिरीज पहले उन 4 षडयंन्त्रकारियों की कहानी को उजागर करती है और इन्हीं पात्रों के जरिये निर्माता निर्देशकने वर्तमान भारतीय समाज की जाति व्यवस्था में शोषण और उससे जन्मे असंतोष के स्वर जिसमे यदा कदा हिंसा के स्वर भी शामिल हैं, धनबल बाहुबल के दम पर न्याय व्यवस्था को ठेंगा दिखाता हुआ शक्तिसंपन्न शोषक, और वह समाज जहाँ स्त्री का बलात्कार एक हथियार की तरह इस्तेमाल होता है, मुसलमानों के साथ हो रहे भेदभाव और उनका अपनी अस्मिता को लेकर भय और मॉब लिंचिंग जैसे सवालों को बड़ी ही साफगोई से परदे पर उकेरा है।"10

मो.आरिफ

(लेखक स्वतंत्र टिप्पणीकार हैं।)

समाज और राजनीति के असल पाताल लोक से रु-ब-रु कराती https://www.hastakshep.com/news-2/entertainment-and-bollywood.

7. "जाति-धर्म के आधार पर भेदभाव, लाचारी की हालात में करप्ट सिस्टम से भरोसा डिगने और गरीबी के चलते बचपन की मासूमियत छिनने के समाज को क्या-क्या नुकसान झेलने पड़ सकते हैं, उसे 'पाताल लोक' कई कड़वे सच के जरिए सामने लाती है."11

अक्षय *प्रताप सिंह, पाताल लोक रिव्यू: पूरी बेबाकी से समाज के कड़वे सच दिखाती वेब सीरीज.*

Updated : 17 May 2020, 07:33 AM IST https:/ /hindi.thequint.com/entertainment/paatal-lok-review-jaideep-ahlawat-neerajkabi-abhishek-banerjee.

8. "2018 तक भारत में ओटीटी प्लेटफॉर्म्स का मार्केट 2150 करोड़ रुपए का था। 2019 के अंत में ये बढ़कर 2185 करोड रुपए का हो गया। यानी, एक साल में 35 करोड़ का इजाफा। इसके बाद भी एकाउंटिंग फर्म प्राइसवाटर हाऊस कूपर्स ने 2023 तक इस मार्केट के 11हजार 977 करोड़ रुपए का होने का अनुमान लगाया था। लेकिन, कोरोनाकाल में ओटीटी प्लेटफॉर्म्स को तेजी से यूजर मिले हैं। इससे ये आंकड़ा और बढ़ सकता है।"12

https:/ /www .bhaskar .com/national/news/ott-platform-subscriptions-during-lockdown-in-india-127556512.html

9. "Film is Considered to be an important art form, a source of popular entertaninment and a powerful method for educating or indoctrinating citizens. The visual elements of cinema give motion pictures a universal power of communication."[13]

Wadia Angela (2008), Film, Television and Radio Production, Kanishka Publishers & Distributors, New Delhi, P.1

10. "The show takes its plot and characters from T arun Tejpal' s novel The Story of My Assassins. There' s also a clear influence of Mindhunter and the methodical brilliance of its creator . But while both T ejpal' s book and the David Fincher series obsess over their respective killers, Paatal Lok takes a more glancing approach."[14]

chief critic Shilajit Misra commented, Paatal Lok' review: A striking glimpse of an orderly hell".

The New Indian Express. Retrieved 23 January 2021.

संदर्भग्रंथ सुची :

1. McQuail Denis, Mass Communication Theory, Vistaar Publication, New Delhi-2005 Fifth Edition, P.7.
2. McQuail Denis, Mass Communication Theory, Vistaar Publication, New Delhi-2005 Fifth Edition, P.8 & 9.
3. https:/ /m.timesofindia.com/business/india-business/indias-video-ott-market-to-touch-12-5-bn-by-2030-report/ amp_articleshow/ 84517492 .cms
4. https:/ /www.techlovers.in/2021/08/what-is-web-series-in-marathi. Html ? m = 1

5. डॉ.पवार *सुधाकर : वृत्तपत्राचे तत्त्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ मंडळ, नागपूर, आवृत्ती 1990, पान क्र.94.*

6. डॉ.पवार *सुधाकर : वृत्तपत्राचे तत्त्वज्ञान, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ मंडळ, नागपूर, आवृत्ती 1990, पान क्र.94.*

7. जोशी *श्रीपाद,संवादशास्त्र, संभव प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती मार्च 1990, पान क्र.12*

8. अभिषेक *कुमार, Best of 2020 : समाज और राजनीति का आईना रहीं इस साल की यह फिल्में और वेब सिरीज https://hindi.newsgram.com/best-of-200-ott-plantforms/*

9. (अनुवाद *: अमरीश हरदेनिया, संपादन : नवल) https://www. forwardpress.in /2020/05/paatal-lok-how-our-feudal-casteist- and-communal-society-churns-out-murderers-hindi/*

10. समाज *और राजनीति के असल पाताल लोक से रु-ब-रु कराती https://www. hastakshep.com/news-2/entertainment-and-bollywood.*

11. Updated *: 17 May 2020, 07:33 AM IST https:/ /hindi. Thequint .com/ entertainment/paatal-lok-review-jaideep-ahlawat-neerajka i-abhishek-banerjee.*

12. https:/ */www .bhaskar .com/national/news/ott-platform-subscriptions-during-lockdown-in-india-127556512.html*

13. Wadia *Angela (2008), Film, Television and Radio Production, Kanishka Publishers & Distributors, New Delhi, P.1*

14. chief *critic Shilajit Misra commented, Paatal Lok' review: A striking glimpse of an orderly hell".*

संशोधक
दवणे हर्षवर्धन किशनराव
माध्यमशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
प्रो.डॉ.राजेंद्र गोणारकर
संचालक
माध्यमशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड